'श्री'

१९.१०.२०२४

नमस्कार,

आजच्या शुभदिनी 'पूजनीय आधारवड' या ग्रंथाचे, एक प्रकारे कृतज्ञतेच्या स्मृतीग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थित असलेले कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री. नरेश राऊत, प्रमुख पाहुणे माननीय डॉ. श्रीकांत सांबाणी, माननीय श्री रत्नाकर गायकवाड, सो. क्ष. समाजोन्नती संघाचे मुख्य विश्वस्त श्री. दीपक चौधरी, ग्रंथाली चे विश्वस्त श्री. हिंगलासपूरकर, सौ. धनश्री धारप, सौ वैशाली रोडे, माझ्या आग्रहाच्या विनंतीला मान देऊन माझ्या सोबत आलेल्या डॉ. सौ. सायरबेडकर, मुख्य भूमिकेत असलेले पुस्तकाचे लेखक श्री. दिगंबर राऊत, सौ राऊत यांना आवर्जून आलेले त्यांचे चिरंजीव श्री दत्त राऊत, त्यांच्या स्नुषा व नात, जमलेले सर्व सो. क्ष समाजाचे ज्ञातिबांधव व भगिनी ....

'पूजनीय आधारवड' हा श्री दिगंबर राऊतांच्या कृतज्ञतेच्या भावनेतून निर्माण झालेला केवळ स्मृतींचा आलेख नसून तो एक ऐतिहासिक दस्तऐवज इतका मोलाचा संग्रह आहे. श्री. राऊतांनी सोयबंशीय क्षत्रिय वाडवळ पाचकळशी समाजाच्या धुरीणांनी आपल्या

Scanned with OKEN Scanner

ज्ञानीला प्रगतीच्या मार्गावर नेण्याच्या दृष्टीने केलेल्या अथक प्रयत्नांचा इतिहास आहे. या सर्वांच्या प्रती व्यक्त केलेली कृतज्ञतेची भावना इथे पानोपानी अनुभवता येते आहे. एक चिनी म्हण आहे, 'When eating bamboo sprouts, remember the one who planted them.' त्याच प्रकारे श्री. राऊतांनी जीवनातले साफल्य मिळवितांना ज्यांच्यामुळे त्यांना सफलता मिळली, ज्यांच्यामुळे अडचणींवर मात करत जीवनाची वाट सुकर झाली त्या सो. क्ष. समाजातील प्रगतीशील, दानशूर समाज नायकांचा जागर 'पूज्य आधारवड' च्या माध्यमातून घातला आहे. हे त्यांचे दुसरे पुस्तक. बोर्डी येथील गोरवले एज्युकेशन सोसायटी संचलित १०५ वर्षांचा इतिहास असलेल्या त्यांच्या शाळे संबंधी - सुनाबाई पेसनजी हकीमजी - सुपेर हायस्कूल मधल्या त्यांना घडवणाऱ्या शिक्षकांना 'तस्मै श्री गुरवे नमः' वाहिलेली सुमनांजली १७ जानेवारी ला शाळेच्या वर्धापन दिनी प्रकाशित केली गेली. ते हे पुस्तक ग्रंथाली प्रकाशन च्या माध्यमातून आपल्या पर्यंत आलेले आहे आणि 'पूज्य आधारवड' ही. उत्कृष्ट छपाई,

Scanned with OKEN Scanner

बोलकी सुरवातीपासूनच, फोटोंची योग्य निवड
न जागा आणि प्रयत्न करूनही न सापडणाऱ्या
शुद्धलेखनाच्या चुका - या बद्दल रोडे मॅडमचा आवर्जून
उल्लेख करावाच लागेल. तसेच सुदेशजी, जोशी
धनश्री मॅडम यांचेही आभार व्यक्त
करावेसे वाटतात. त्यांची पुस्तकांच्या निवडी
पासून ते पूर्ततेपर्यंतची चिकित्सक प्रक्रीया
यामुळे पुस्तक अंतिमत: अत्यंत देखणे होते.

'पूज्य आधारवड' या मथळ्याखाली सो.क्ष समाजाची
उत्पत्तीबद्दल सांगतांना शंभर, सव्वाशे वर्षापूर्वीच्या
समाजाचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. या
समाजाच्या घडणीचा इतिहास डॉ. नरेश हरिश्चंद्र
सावे यांनी मोठ्या रंजक पध्दतीने मांडलेला आहे.
१९ व्या शतकात हा समाज बागे जिल्ह्यात
म्हणजे आजच्या पालघर जिल्ह्यात स्थिरावायला
लागला, परंतू समाज म्हणून त्याला ओळख
मिळाली ती १९१९ मध्ये अण्णासाहेब वर्तकांच्या अग्रणीच्या
धाडसी पावलामुळे - 'उध्दरेत आत्मना आत्मानम'
ही श्रीमद्भगवद्गीतेतील शिकवण स्विकारून
यांनी सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नती संघाची
स्थापना केली. आवर्जून उल्लेख करावासा
वाटतो की या मंडळाने सुरुवातीपासूनच घटना
तयार करून ती मंजूर केली - कोणत्याही

कृतीतल, संघटनेतल स्वतःची ध्येय निश्चित केलेली असतील तर मार्गक्रमणा करणे सोपे जाते. तेंव्हा कोणत्याही मॅनेजमेंटचे अभ्यासक्रम असतांनाही शंभर वर्षापूर्वी goals and objectives निश्चित करण्याचा दृष्टेपणा या समाजधुरीणांनी दाखवला हे खूपच प्रेरणादायक आहे. त्यांच्या लक्षात आले की आपल्या समाजाचा विकास साधायचा असेल तर अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, दारिद्र्य यातून त्याला बाहेर काढले पाहीजे. एकप्रकारे समाजाचा SWOC analysis केला — Strengths, Weakness, Opportunities and Challenges. शिक्षण ही मोठी संधी निर्माण करु शकते हे लक्षात आल्यावर या समाजाने शिक्षणावर भर दिला, दुर्गम ठिकाणी शाळा काढल्या, शिक्षण प्रसारा सोबतच अंधश्रद्धा निर्मूलन आणि व्यसनाधिनतेचे प्रश्नही हाताळले. काही निःस्वार्थ, प्रामाणिक विचारांचे समान बांधव आपल्या इतीचा विकास साधण्यासाठी किती व कसे प्रयत्न करतात त्याची एक केस स्टडीज 'पूज्य आधारवड' च्या माध्यमातून आपल्या समोर येते. त्यांनी काही वर्ष समाजाची १९२१ ते १९७९ स्वानेसुमारी केली

शिक्षण, उद्योग, राजकारण असे एकएक
टप्पे या धुरीणांनी काबीज करत आज या
समाजाला अत्यंत उन्नत अशा ठिकाणी
आणलेले आहे व आता त्या आधारवडाच्या
झक्कम पारंब्या हे काम जोमाने करत
आहेत. या आधारवडाच्या माध्यमातून
लोकनेते अण्णासाहेब वर्तक व पद्मश्री भाऊसाहेब
वर्तक, भाईजी जगू राऊत, मुकुंदराव सावे,
महादेव लक्ष्मण राऊत, भास्करराव व मालचंद
पाटील, दादासाहेब ठाकूर, प्रमोद चुरी, कल्पिता
प्रमोद चुरी, आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष
श्री. नरेशभाई राऊत अशा एकोणीस थोर
व्यक्तींच्या जीवन कार्याची ओळख घडणार आहे.

एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते
की या व्यक्तीरेखा साकारतांना राऊत यांनी
अत्यंत प्रामाणिक कथन केले आहे, वास्तवातले
चित्र उभारले आहे, त्यामुळे ते जास्त जीवंत
आणि सच्चं वाटतं. ते स्वतः नात्यासाहेब चुरी
वसतिगृहाचे काम पहात असतांना भाऊसाहेब वर्तक
आणि त्यांचे अनेक वर्षांचे असलेले जिव्हाळ्याचे
संबंध नात्यातले का होईना पण कसे दुरावले याचे
अत्यंत प्रामाणिक वर्णन राऊतांनी केले आहे.
केवळ व्यक्तीपूजेचा यात कोठेही मानस दिसत नाही.
त्यामुळेच या सर्वच व्यक्ती या आपल्यातल्या वाटतात
स्वतःच्या वाटतात

या व्यक्ती ज्या काळात कार्यरत होत्या तेंव्हाची सामाजिक परिस्थिती, अवस्था, व्यवस्था, याचे चित्रण ओघाने येतेच. त्यात सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब सापडते. एखाद्या वास्तूशास्त्राची त्यावेळची परिस्थिती कशी होती याचे औत्सुक्य असेल तर भायजी जगू राऊत यांच्या १०० वर्ष जुन्या राऊत वाड्याचे वर्णन उपयुक्त ठरेल. इतकेच काय, त्या वाड्याच्या बांधकामाला त्याकाळी आलेला १८००० रुपयांचा धसघशीत खर्च, दगडविटांच्या बांधकामासाठी व भिंतीच्या गिलाव्यासाठी वापरलेला मध आणि हिरड्यामुळे आजही दीडशे वर्षानंतर घराच्या भिंतीना कुठे साधे खरचटलेही नाही, या वस्तुस्थितीचा फोटो, ८८ फूट X ८८ फूटाचा त्याचा विस्तार हा सगळा तपशील ऐतिहासिक संशोधकाला फारच उपयुक्त ठरु शकेल.

मला आवर्जून एका गोष्टी इथे उल्लेख करायचा आहे. तो ही की या समाजातील धुसर स्त्री संबंधीचा केलेला विचार - स्त्री शिक्षणावर भर दिला होता, हुंड्याची प्रथा या समाजाने कधीच स्विकारली नाही. सुमारे १०० वर्षापूर्वी महाराष्ट्रातील स्त्री वर्गाला आपल्या स्वत्वाची व सामर्थ्याची जाणीव करुन घेऊन त्यांच्यात स्फुल्लिंग निर्माण करणारे मुकुंदराव साळवे हे बोर्डी परिसरातील अग्रणी समाजसेवक, महिला संघटनेचे ते आद्य प्रवर्तक होत

मुकुंदराव साबे यांनी 'नव्या युगातील स्त्री' हे पुस्तक लिहीले आहे. हे पुस्तक त्यांच्या स्त्री विषयीच्या आत्मचिंतनातून निर्माण झालेल्या विचार तरंगांचे दर्शन आहे. त्यातील काही निवडक विचार असे आहेत - ८४, ८६. महात्मा गांधींच्या विचारानेही ते प्रेरित झाले होते. मुकुंदरावांचे विचार हे आजही किती समर्पक आहेत! नव्या युगातील स्त्री या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्रही बघायला मिळेल. तेही अत्यंत लक्षवेधी आहे.

अशा अनेक समाज पुरुषांचे दर्शन या पुस्तकाच्या माध्यमातून घडते व त्या योगे वर्तमान आणि भूतकाळ याची सांगड घालत भविष्यकाळाची चाहूल घेणे शक्य होते. स्वतः श्री दिगंबर राऊत यांचेही या समाजातील योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्याचा खारीचा वाटा वर्णन करताना ते या सामाजिक कार्यशी कसे आणि किती जोडले गेले ते लक्षात येते. १९६५ ते आजपर्यन्त त्यांनी या सामाजिक संस्थेला योगदान दिले आहे. अगदी लहान वयात, घरातील संस्कारातून आपण आपल्या भोवतालच्या समाजाचे कोढेनरी देणे लागतो, तुमच्या कर्तृत्वाचा सिंहाचा उपयोग सर्वसामान्यांना होत असतो, समाजासाठी तुम्ही शून्य असता' हे विचार मनावर कोरले गेले असल्याने - आपण समाजाला काय देऊ शकू

या विचारातून 'पूजनीय आधारवड' या पुस्तकाची संकल्पना पुढे आली असणार.

एखादी संस्था आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक वा इतर कोणत्याही क्षेत्राशी निगडीत असो, सक्षम, पावन हात, भविष्याचा वेध घेणारी दूरदृष्टी व जनहिताची आंतरिक तळमळ असणारे संवेदनशील मन, या त्रिसूत्रीवर निघी पायाभरणी होत असते व अशाच संस्था चिरकाल टिकून हे सोमवंशीय क्षत्रिय समाजोन्नती संघाच्या रूपाने सिध्द होते.

श्री. दिगंबर राऊतांची लेखनशैली ही अत्यंत रोचक, मुद्देसूद व संशोधकाच्या वृत्तीतून सत्यकथन करण्याची आहे. अगदी चपखल आणि अर्थपूर्ण चपखलपणे, सहजच येणारे संस्कृत श्लोक, श्रीमद् भगवद्गीता, भागवत, ज्ञानेश्वर माऊलींचे तसेच तुकाराम महाराजांचे अभंग ओव्या हे श्री राऊतांच्या 'आध्यात्मिक अभ्यासाची झलक देऊन जातात. 'पुजनीय आधारवड' हा निश्चितपणे सो.क्ष. समाजाच्या प्रगतीचा, विकासाचा एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून अत्यंत मौल्यवान ठरणार आहे यात कोणतीच शंका नाही.

या प्रत्येक व्यक्तीवर्णनामध्ये त्या त्या कुटुंबातील स्त्रीयांच्या योगदानाचा ओझरता उल्लेख आलेला आहे. पदराआड राहून/ वडीलधाऱ्यांच्या नजरेच्या,

मुलाच्या, कार्यकर्तृत्वात साथ देणाऱ्या आई, पत्नी, मुलगी या नात्याने समरसून ज्ञानभाऊ लावणाऱ्या अनेकींचा उल्लेख लेखांमधून आला आहे. परंतू स्वतंत्र लेख फक्त कल्पनाप्रमोद चुरींच्यावर लिहीलेला आहे. मला असे वाटते की अशा या 'लापता लेडीज' ना प्रकाशात आणण्याचे काम होणे आवश्यक आहे, विशेषत: स्त्रीयांबद्दलचे इनके पूर्वग्रहदूषित विचार अंगीकारलेल्या समाजातील स्त्रीयांनी केलेल्या योगदानाचाही गांभिर्याने मांडला जावा असे वाटते. अर्थात हेही काम श्री. दिगंबर राऊतांची लेखणी व त्या मागचे संवेदनशील, संशोधकाचे मन करु शकेल याची खात्री आहे.

एक अत्यंत प्रेरणादायक लेखसंग्रह वाचकांच्या हाती दिल्याबद्दल श्री दिगंबर राऊतांचे शतश: आभार व त्यांच्या पुढील लेखन वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

There are two ways to live your life
One is as though nothing is a miracle
The other is as though everything is a miracle. असे आईनस्टाईन म्हणत होता.
I would choose the second - everything is a miracle!